सीएनआरक्रएमएचबीयु१६००–१०५१–२०२२ सं.फौ.ख.क्र.६७०/२०२२

# वि.न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, यांचे न्यायालय, मोताळा.

## प्रकरणाचा तपशील.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | घटना दिनांक | – | १८.१०.२०२२ |
| २. | फिर्याद दाखल दिनांक | – | १८.१०.२०२२ |
| ३. | फिर्यादीचे नाव व पत्ता | – | पोलीस ठाणे अधिकारी,<br>बोराखेडी. |
| ४. | आरोपीचे पूर्ण नाव व पत्ता | – | फारुक अहेमद शेख शब्बीर,<br>वय ३० वर्षे, धंदा – ॲपे चालक,<br>रा.मोताळा, ता.मोताळा, जि.बुलडाणा |

५. गुन्हयाचा तपशील –

तुम्ही आरोपीने दिनांक १८.१०.२०२२ रोजी १८.०० वाजेच्या सुमारास मोताळा फाटा येथे तुमच्या ताब्यातील वाहन क्र.एमएच–२८–टी–०४४१ रहदारीचे रस्त्यावर लोकांचे जिवीत्वास धोका निर्माण होईल अशा पद्धतीने सार्वजनिक ठिकाणी उभे केले व त्यावरुन आपण भारतीय दंड विधानाचे कलम २८३ नुसार अपराध केला आहे व त्याची हे न्यायालय दखल घेत आहे.

प्रश्न १ – आपणास दोषारोपपत्राची प्रत मिळाली काय ?

उत्तरः होय.

प्रश्न २ – तुमच्यावर ठेवण्यात आलेले दोषारोप, ते तुम्हाला आता वाचुन व समजावून सांगण्यात आले, ते तुम्हाला समजले काय ?

उत्तरः होय.

प्रश्न ३ – तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?

उत्तरः होय.

.................................... समक्ष,

आरोपीची सही.

स्वा.

(**एस.पी.पांडव**)

दिनांक २०.१०.२०२२ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मोताळा.

सीएनआरक्रएमएचबीयु१६००–१०५१–२०२२ सं.फौ.ख.क्र.६७०/२०२२

**आदेश**.

आरोपीविरुद्ध ठेवण्यात आलेल्या गुन्हयांचा तपशील आरोपीला समजावून सांगण्यात आला. त्याने गुन्हा कबुल असल्याचे सांगितले. तसेच आरोपीने गुन्हा कबूल असल्याची पुरसीस नि.क्र.२ वर दाखल केली आहे. आरोपीवर ठेवण्यात आलेल्या गुन्हयातील शिक्षेची तरतुद आरोपीला समजावून सांगण्यात आली. मी आरोपीकडे चौकशी केली असता आरोपी स्वतःहुन गुन्हा कबुल करीत असल्याबाबत माझे समाधान झाले.

शिक्षेच्या मुद्यावर आरोपीचे म्हणणे ऐकले. आरोपीने दया दाखविण्याची विनंती केली. आरोपीची गुन्हेगारी पार्श्वभुमी असल्याचे दर्शविणारा पुरावा अभिलेखावर आलेला नाही. भा.दं.वि.चे कलम २८३ मध्ये दोनशे रुपये पर्यंत द्रव्यदंडाच्या शिक्षेची तरतुद आहे. करिता मी खालील आदेश पारित करीत आहे.

**आदेश**.

१. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५२ अन्वये आरोपीस भारतीय दंड विधानाचे कलम २८३ या गुन्हयांकरिता दोषी ठरविण्यात येते.

२. आरोपीस भारतीय दंड संहितेचे कलम २८३ या अपराधांकरिता द्रव्यदंड रु.२००/– ठोठावण्यात येते. आरोपीने दंड न भरल्यास एक दिवस साध्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यात येत आहे.

SUJAY PRAKASHRAO PANDAV

Digitally signed by SUJAY PRAKASHRAO PANDAV Date: 2022.10.20 16:33:35 +0530

(**एस.पी.पांडव**)

दिनांक २०.१०.२०२२ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मोताळा.